महाराष्ट्र शासन
शासकीय होमिओपॅथी महाविद्यालय, जळगाव
श्री गुलाबराव देवकरअभियांत्रिकी महाविद्यालय परीसर,
शिरसोली रोड, जळगांव
ईमेल-ghmcjalgaon@gmail.com

| जा.क्र.शाहोमज/ सहाय्यक प्रा.कं पद भरती/ 1561 /२०२६ | दि.31 /07/२०२६ |
|---|---|

## शासकीय होमिओपॅथीक महाविद्यालय, जळगांव. येथील सहाय्यक प्राध्यापक ही पदे कंत्राटी पद्धतीने भरणे बाबत

संदर्भ :- शासन निर्णय वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग क्रं.एमईएस, दिनांक ११ मे २०१७ व दिनांक ०९ मे २०२२, ७ सप्टेंबर, २०२२

उपरोक्त संदर्भित दि. ०९.०५.२०२२ व दि.२५.०४.२०२३ च्या शासन निर्णयान्वये शासकीय होमिओपॅथीक महाविद्यालय, जळगांव येथील पदे मंजुर केलेली असुन, संदर्भित शासन निर्णय दि.०७.०९.२०२२ अन्वये महाविद्यालयातील सदर पदे ११ महिन्याच्या कालावधीकरिता कंत्राटी मानधन तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती करण्यासाठी मान्यता दिलेली आहे. त्यानुसार या महाविद्यालय रिक्त असलेली अध्यापक, पदे तात्पुरत्या स्वरुपात ११ महिन्याच्या कालावधीकरिता भरण्यात आलेली आहेत. तसेच सहाय्यक प्राध्यापक, प्रॅक्टीस ऑफ मेडीसीन (कंत्राटी) या पदाकरीता मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, छत्रपती संभाजीनगर यांचा अंतिम निकाल लागलेला नसून त्यामुळे सहाय्यक प्राध्यापक, प्रॅक्टीस ऑफ मेडीसीन (कंत्राटी) हे पद मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, छत्रपती संभाजीनगर यांच्या निकालाच्या अधीन राहून सदर पदांवर ११ महिन्याच्या कालावधीकरिता कंत्राटी मानधन तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती करण्यासाठी विहित अटी व शर्तीची पुर्तता करणा-या पात्र व इच्छुक उमेदवारांच्या प्रत्यक्ष मुलाखती आयोजित करण्यात येत आहेत.

तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने भरावयाच्या पदांचा विषय व तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | पदनाम | विषय | पदसंख्या | प्रत्यक्ष मुलाखतीचा दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | सहाय्यक प्राध्यापक | प्रॅक्टीस ऑफ मेडीसीन (Practice of Medicine) | ०१ | दि.१०.०८.२०२६ |

| प्रत्यक्ष मुलाखतीचे स्थळ - | शासकीय होमिओपॅथी महाविद्यालय, जळगांव<br>श्री. गुलाबराव देवकर अभियांत्रिकी माहाविद्यालय परिसर,<br>शिरसोली रोड, जळगांव. ४२५००२. |
|---|---|

| Post | Assistant Professor |
|---|---|
| Age | Maximum age limit ६५ years |
| Essential Educational Qualification | • Post Graduate qualification in Homoeopathy. (As per MSR- २०२४)<br>• The qualification shall be the one included in second schedule of Homeopathy Central council act १९७३.<br>• Preference shall be given to those candidates who holds experience of working as RMO/Medical Officer or house physicians in a Homeopathic hospital attached a Homeopathic medical college permitted by central council/Central government. (As per MSR- २०२४) |
| Experience | Preference shall be given to those candidates who holds experience of working as RMO/Medical Officer or house physicians in a Hospital attached to a medical college permitted by Medical council/Central government |

| | | |
|---|---|---|
| | १३. | उमेदवार सध्या अन्य संस्थेत कार्यरत असल्यास संबंधित संस्थेचे ना-हरकत प्रमाणपत्र प्रत्यक्ष मुलाखतीच्या दिवशी सादर करणे तसेच उमेदवाराची निवड झाल्यास रुजु होते वेळी संबंधित संस्थेचे कार्यमुक्ती आदेश (Relieving Order) सोबत असणे आवश्यक राहील. |
| | १४. | सदर पदाचे कंत्राटी मानधन "१०- कंत्राटी सेवा" या लेखाशिर्षाखाली अनुदान उपलब्धतेनुसार अदा करण्यात येत असल्याने सदर लेखाशिर्षात अनुदान उपलब्ध होईपर्यंत विलंब होऊ शकतो. त्यासाठी कार्यालयाकडे कोणताही तगादा लावता येणार नाही. |
| | १५. | CME प्रशिक्षण/P.hD./ कार्यशाळा कालावधी कर्तव्य कालावधी धरण्यात येणार नाही. त्याकरिता नियमाप्रमाणे नैमित्तीक रजा भरुन द्यावी लागेल अथवा सदर CME प्रशिक्षण/P.hD./ कार्यशाळा दरम्यानच्या कालावधीचे वेतन कपात करण्यात येईल. |
| | १६. | कंत्राटी पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या उमेदवारास कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार प्रदान करण्यात येणार नाहीत. |
| | १७ | उमेदवारानी मुलाखतीस येतांना आवश्यक ते सर्व संबंधीत मुळ कागदपत्रे व त्यांच्या सत्यप्रती सोबत आणाव्यात तसेच अनुभव प्रमाणपत्र, सध्या इतर संस्थेत कार्यरत असल्यास सदर संस्थेचे ना हरकत प्रमाणपत्र आणणे अनिवार्य राहील. |
| | १८ | उमेदवारास प्रथम नियुक्ती देण्यात आल्यानंतर किमान एक शैक्षणिक सत्र संपेपर्यंत त्यास कोणत्याही परिस्थितीत सेवा सोडता येणार नाही. तशा आशयाचे शपथपत्र तात्काळ सादर करणे आवश्यक राहील. तसेच शैक्षणिक सत्र सुरु असलेल्या कालावधीत विद्यार्थीहित/रुग्णहित विचारात घेता उमेदवाराचा राजीनामा कोणत्याही परिस्थितीत स्विकारला जाणार नाही. |
| | १९ | महाविद्यालय व रुग्णालयाचे अधिष्ठाता यांचे नियंत्रणाखाली व निर्देशानुसार सदर पदाची कर्तव्ये व जबाबदा-या पार पाडाव्या लागतील. |
| | २० | बिगर सेवानिवृत्त गटातून कंत्राटी पध्दतीने नियुक्त होणाऱ्या अध्यापकाची नंतरच्या काळात नियमित नियुक्ती झाल्यास त्याला पूर्वीच्या सेवेचे कोणतेही लाभ अनुज्ञेय असणार नाहीत. |
| | २१ | उमेदवारास शासन निर्णय वै.शि.व औ.द्र.विभाग क्र.आयुसे-1120/प्र.क्र.89/आयु-1, दि.07.09.2022 अन्वये विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती लागू असुन, त्याचे पालन करणे बंधनकारक राहतील. |

तरी इच्छुक व पात्र उमेदवारांनी www.mahaayush.gov.in तसेच www.ghmcjalgaon.in या वेबसाईट वर उपलब्ध करुन दिलेल्या विहीत नमुन्यातच अर्ज भरुन, आवश्यक मुळ प्रमाणपत्रे व त्यांच्या १ स्वसाक्षांकीत प्रतीसह **शासकीय होमिओपॅथी महाविद्यालय, श्री गुलाबराव देवकर अभियांत्रिकी महाविद्यालय परिसर, शिरसोली रोड, जळगाव ४२५००२ येथे वर नमुद केल्यानुसार स्वखर्चाने प्रत्यक्ष मुलाखतीकरिता सकाळी १०.०० वाजता उपस्थिती रहावे. (सकाळी ११ वाजेनंतर उपस्थित राहणाऱ्या उमेदवारांचा मुलाखतीसाठी विचार केला जाणार नाही.)**

डॉ. संतोष गुलाबराव चव्हाण
अधिष्ठाता
शासकीय होमिओपॅथी महाविद्यालय
जळगाव